## नि.दि.दा.नंबर १२१/२०२५ मधील निशाणी १६ चे अर्जावरील आदेश.

## भिमाप्पा कुंभार वि. शोभा माळी वगैरे

प्रस्तुतचे अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करणेसाठी दिलेला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे:–**

२. प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर ताकीदीसाठी व डिक्लेरेशनसाठी दाखल केले आहे. परंतु दाव्यामध्ये वादी यांनी खरेदी घेतलेल्या दस्ताची दि. **"२५/०८/१९८९" ऐवजी दि. "२५/०८/१९९८"** अशी चुकीची टाईपींग मिस्टेकने नमुद झालेली आहे. वादी यांनी खरेदी केलेल्या दस्ताचा क्र. **"८९/१९८९"** असा आहे. परंतू काही ठिकाणी टाईपिंग मिस्टेकने व नजर चुकीने **"८९/१९९८"** असे नमुद झालेले आहे. सदर झालेली चुक ही केवळ टाईपींग ची चुक असुन नजरचुकीने झालेली चुक आहे. त्यामुळे वादी यांनी दावा कलम ७ मधील ९ वी ओळीत, दावा कलम ७ मधील २१ व्या ओळीत, पान नं. ६ वरील दावा कलम १२/ब मध्ये सदर चुक दुरूस्ती करण्यास परवानगी मागितली आहे व सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादीचे अर्जातील पुढील कथनाप्रमाणे सदरप्रमाणे दुरूस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलत नाही, प्रतिवादी यांचे काहीही नुकसान होणार नाही उलट प्रस्तूत प्रकरणी न्यायनिर्णय होण्यास मदत होणार असल्याचे कथन त्यांनी केले आहे.

**४.** प्रतिवादी तर्फे नि.क्र. १८ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केलेले आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे न्यायाच्या दृष्टीने योग्य ते आदेश पारीत व्हावेत अशी विनंती त्यांनी केली आहे.

**५.** प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## का र ण मी मां सा

**६.** वादी विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पहाणी केली असता असे दिसुन येते की प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीदीसाठी व डिक्लरेशनसाठी करण्यात आलेला आहे. वादीच्या दाव्यातील मुळ दाव्यातील मागणीचे स्वरुप केलेली मागणी विचारात घेता अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. दावा दुरुस्तीच्या अनुशंगाने वादी यांनी फेरीस्त नि. ३/१ वर सदर खरेदी दस्ताची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर खरेदीदस्ताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दस्त दि. २५/०८/१९८९ रोजी झालेला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तूत अर्जाद्वारे सुचवलेली दुरुस्ती वस्तूस्थितीप्रमाणे आहे. त्यामुळे सदर

अर्ज मंजुर केल्यास त्याचा कोणताही विपरीत परिणाम प्रतिवादींवर होणार नाहीपरंतू सदर दुरुस्तीमूळे प्रकरणात झालेल्या विलंबाबाबत वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये २००/– अदा करणे योग्य होईल, असे प्रामाणिक मत व्यक्त करुन मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील अंतिम आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीस केवळ दाव्यामध्ये नमुद दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी याने झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी यांना रक्कम रु. २००/– खर्च अदा करावेत.

४. वादींनी त्या अनुशंगाने दाव्यामध्ये पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन, दाव्याची दुरुस्त प्रत सादर करावी.

MAHESH ARVINDRAO KULKARNI

Digitally signed by MAHESH ARVINDRAO KULKARNI
Date: 2026.02.06 17:27:31 +0530

**(एम. ए. कुलकर्णी )**

**दिनांक: ०६.०२.२०२६**

सह दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
कवठेमहांकाळ.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original order / judgment.

| | | |
|---|---|---|
| | | |
| Name of the Stenographer | : | Mrs. J. A. Salunkhe.<br>(Stenographar grade - III) |
| Court | : | Jt. C.J.J.D. and J.M.F.C.,<br>Kavathe Mahankal. |
| Date | : | 06.02.2026 |
| Order /judgment signed by P.O. on | : | 06.02.2026 |
| Order /judgment uploaded on | : | 06.02.2026 |